MHPU180001062023

## निशाणी ५ वरील आदेश

(आदेश दि.२५.१०.२०२३ रोजी)

प्रस्तुत अर्ज वादींनी प्रतिवादीविरुध्द तूर्तातूर्त मनाई आदेश मिळण्याकरीता दाखल केला आहे.

**अ. मिळकतीचे वर्णनः–** तालुका पंचायत समिती दौंड, जिल्हा परिषद पुणे यांच्या हद्दीतील तसेच दुय्यम निबंधक सो., केडगांव/दौंड यांच्या नोंदणीकक्षेतील, ग्रामपंचायत गांव मौजे देवकरवाडी येथील शेतजमीन मिळकतः–

| गट नंबर | क्षेत्र हे. आर. | आकार रु. पैसे |
|---|---|---|
| **१९** | ०१ – ६१ | ०० – ५८ |

यासी चतुःसिमा खालीलप्रमाणेः–

**पुर्वेसः–** पाटेठान–दहिटणे रस्ता.
**दक्षिणेसः–** गट क्र. २२ व २४ (वादी क्र. ३).
**पश्चिमेसः–** गट क्र. २० व २१.
**उत्तरेसः–** गट क्र. १८.

**ब. मिळकतीचे वर्णनः–** तालुका पंचायत समिती दौंड, जिल्हा परिषद पुणे यांच्या हद्दीतील तसेच दुय्यम निबंधक सो., केडगांव/दौंड यांच्या नोंदणीकक्षेतील, ग्रामपंचायत गांव मौजे देवकरवाडी येथील शेतजमीन मिळकतः–

| गट नंबर | क्षेत्र हे. आर. | आकार रु. पैसे |
|---|---|---|
| **२४** | ०१ – १८ | ०० – ८७ |

यासी चतुःसिमा खालीलप्रमाणेः–

**पुर्वेसः–** पाटेठान–दहिटणे रस्ता.
**दक्षिणेसः–** गट क्र. २५ (श्री. काटे यांची मिळकत).
**पश्चिमेसः–** गट क्र. २२ व २३.
**उत्तरेसः–** गट क्र. १९.

**क. मिळकतीचे वर्णनः–**. तालुका पंचायत समिती दौंड, जिल्हा परिषद पुणे यांच्या हद्दीतील तसेच दुय्यम निबंधक सो., केडगांव/दौंड यांच्या नोंदणीकक्षेतील, ग्रामपंचायत गांव मौजे देवकरवाडी येथील शेतजमीन मिळकतः–

| गट नंबर | क्षेत्र हे. आर. | आकार रु. पैसे |
|---|---|---|
| **२१ व २२** | ०३ – ०१ | ०४ – ३१ |

यासी चतुःसिमा खालीलप्रमाणेः–

**पुर्वेसः–** गट क्र. १९ व २४.
**दक्षिणेसः–** गट क्र. २३ (श्री. देवकर यांची मिळकत).
**पश्चिमेसः–** गट क्र. १ ते ४.
**उत्तरेसः–** गट क्र. २० व १९.

त्यातील तदंगभुत वस्तुसहीत सदरील मिळकती या दाव्याचा विषय आहे. (सदर मिळकती या दाव्याचा विषय असुन त्यास यापुढे ''**दावा मिळकती**'' म्हणुन संबोधिले जाईल).

**२.** दावा मिळकत १अ मधील मिळकत ही वादी क्र. १ व २ यांची मालकीहक्क ताबेवहिवाटीची मिळकत आहे. १ब मधील मिळकत ही वादी क्र. ३ आणि त्यांचे कुटूंबिय यांच्या मालकी हक्क, ताबेवहिवाटीची मिळकत आहे. १क मधील मिळकत ही प्रतिवादीची मालकी व ताबेवहिवाटीची मिळकत आहे.

**३.** यांच्याकडे कलम ५ अन्वये एसआर/०८/२०१७ हा रस्ता खुला करुन मिळण्यासाठी अर्ज दाखल केला. त्या अर्जाच्या कामी दावा मिळकतीचे पंचनामे होउन दावा मिळकतीमध्ये कसल्याही प्रकारचा रस्ता अस्तित्वात नाही असा पंचनामा झाला. त्यानंतर प्रतिवादी क्र.१ दि.१९/१०/२०१८ रोजी त्या अर्जामध्ये रस्त्याची मागणी चुकीच्या पध्दतीने केली म्हणुन अर्ज निकाली काढण्यात यावा असा अर्ज दिला. मे.तहसीलदार दौंड यांनी दि. २९/१०/२०१८ रोजी तो अर्ज नामंजुर करुन आदेश पारित केला.

**४.** प्रतिवादीने तहसीलदार, दौंड यांच्याकडे मामलतदार कोर्ट एक्टचे कलम ५ नुसार गट क्र. १९ व २४ मौजे देवकरवाडी, दौंड, पुणे यांच्या बांधावरुन असलेल्या रस्त्यातील अडथळा काढुन खुला करुन देण्यासाठी दाखल केला होता. त्यामध्ये वादींना बजावणी झाली होती. त्या अर्जाचा गुणदोषावर दि. ३१.०५.२०२२ रोजी निकाल झाला होता. त्या अर्जाच्या चौकशीकामी देवकरवाडीचे तलाठी यांनी त्यासंदर्भात पंचनामा केला होता. तहसिलदार यांनी त्या अर्जात न्यायिक चौकशी करुन अर्जाचे न्यायनिर्णय केले होते. प्रतिवादींचा गट क्र. १९ व २४ मधील बांधावरील जाण्या–येण्याच्या रस्त्याची मागणी तहसिलदार यांनी फेटाळली होती. प्रतिवादीने तो आदेश आव्हानित केलेला नाही. तहसिलदार यांनी त्या आदेशामध्ये जमीन गट क्र. १९ मध्ये रस्ता दिसुन आलेला नाही. तसेच जमीन गट क्र. २४ चे लगत पालक पेरलेले दिसुन येत आहे. गट क्र. २४ मध्ये ऊस पिक आहे. त्यामुळे अर्जदाराच्या अर्जानुसार त्याठिकाणी रस्ता असल्याचे सिध्द होत नाही असे निष्कर्ष नोंदविलेले आहे.

**५.** त्यानंतर प्रतिवादीने वादींचे शांततामय कब्जेवहिवाटीस हरकत अडथळा केला तसेच वादींच्या मिळकतीमध्ये घुसण्याचा प्रयत्न केला. प्रतिवादीने सर्व सर्वतोपरी वादींच्या ताबेवहिवाटीस हरकत अडथळा करण्याचे तसेच वादींच्या मिळकतीत हस्तक्षेप करण्याचा प्रयत्न केलेला आहे. गट क्र. १९ व २४ मध्ये कोणताही बांध अगर सरबांध नाही. त्या दोन्ही गट क्रमांकाच्या हद्दी या वेगळ्या आणि ओळखण्याजोग्या असुन त्यामध्ये तारेचे कंम्पाऊंड झालेले आहे. वादींनी सरकारी मोजणी करुन तशा हद्दीच्या खुणा भुमी अभिलेख कार्यालयात झालेल्या आहेत. गट क्र. १९ व २४ या मिळकती भुमी अभिलेख विभागाने मोजणी केलेल्या असुन त्याच्या हद्दीच्या खुणांचे अभिलेख क प्रत जारी केलेले आहे.

६. प्रतिवादीने कलम १४३ महाराष्ट्र जमीन महसुल कायदा, १९६६ अन्वये गट क्र. २४ व १९ मौजे देवकरवाडी यामध्ये जाण्या–येण्याच्या रस्त्याच्या मागणीचा अर्ज वादी क्र. १ व ३ विरुध्द दाखल केला. त्यामध्ये वादी क्र. २ ला पक्षकार केलेले नाही. वादी क्र. १ व ३ यांना नोटीशीची बजावणी झाल्यानंतर ते तहसिलदार, दौंड यांचे कोर्टात हजर झाले व त्यांनी त्यांचे म्हणणे व जबाब दाखल केले आहे. तहसिलदार, दौंड यांनी स्थानिक तलाठी मौजे देवकरवाडी यांना पंचनामा करण्याचे आदेश केले. तलाठी मौजे देवकरवाडी यांचा पंचनामा हा त्या अर्जात दाखल होता. वादींनी अर्जामधुन खुलासेवार प्रतिवादी हे रस्ता मागणीकरीता पात्र नाही याबाबत जबाब दिलेला होता. तहसिलदार, शिरुर यांनी दि. १२.१२.२०२२ रोजी प्रतिवादींचा अर्ज मंजुर केला आणि गट क्र. २४ व १९ च्या सरबांधावरील अडथळा ठरलेले महावितरणाचे पोल महावितरण विभागाचे कर्मचारी यांच्या मदतीने काढुन घ्यावे असा आदेश केलेला आहे. तसेच तहसिलदार यांनी मौजे देवकरवाडी येथील गट क्र. २२ मध्ये जाणे–येणेसाठी पाटेठाण–दहिटणे उत्तर–दक्षिण रस्त्याला लागुन पश्चिमेकडे गट क्र. २४ व १९ च्या बांधावरुन पुर्वेकडुन पश्चिमेकडे १० फुट रुंदीचा रस्ता मंजुर केला आहे. तहसिलदार यांनी आदेशामध्ये गट क्र. २४ व १९ च्या बांधावरुन प्रतिवादीला रस्ता मंजुर केलेला आहे. परंतु गट क्र. १९ व २४ मध्ये बांध किंवा सरबांध अस्तित्वात नाही तसेच त्या दोन्ही गटाच्या हद्दीवर काटेरी कुंपन आहे. तहसिलदार यांनी कलम १४३ प्रमाणे त्यांच्या अधिकारक्षेत्राचा गैरवापर करुन प्रतिवादींना वादींच्या मिळकतीत बांध किंवा सरबांध अस्तित्वात नसतांना नवीन रस्ता करुन देण्याचे आदेश दिलेले आहेत. सदर आदेश हे महाराष्ट्र जमीन महसुल कायद्यामधील नियमाच्या विरुध्द दिलेले आहेत. तहसिलदार यांनी बेकायदेशीर आदेश करुन वादींच्या मिळकतीतुन नवीन रस्ता देण्याचे आदेश कायद्याच्या तरतुदीच्या विरुध्द जाऊन दिलेले आहेत. त्यामुळे वादींनी तहसिलदार यांचा आदेश रद्द होऊन मिळण्याकरीता प्रस्तुत दावा दाखल केलेला आहे. प्रतिवादी हे तहसिलदार यांच्या बेकायदेशीर आदेशाच्या गैरफायदा घेऊन वादींचे मालकी हक्क ताबेवहिवाटीस अडथळा आणु पाहात आहेत. प्रतिवादी हे तहसिलदाराच्या आदेशाच्या अनुषंगाने महावितरणाचे पोल काढु पाहात आहे आणि त्याची सुरुवात वादींचे मिळकतीत प्रवेश करुन मिळकत क्र. १क मध्ये जाण्यासाठी रस्ता तयार करीत आहे. तसेच प्रतिवादी हे वादींच्या मिळकतीत बेकायदेशीररित्या अतिक्रमण करण्याची शक्यता नाकारता येत नाही. प्रतिवादी जर या प्रयत्नात यशस्वी झाले तर वादी यांचे कधीही न भरुन येणारे असे आतोनात नुकसानास सामोरे जावे लागेल. सदर दाव्यामध्ये वादी तहसिलदारांचा दि. १२.१२.२०२२ रोजीचा आदेश आव्हानित करीत आहे व तो रद्द होऊन मिळण्यासाठी तसेच तुर्तातूर्त मनाई आणि निरंतर मनाई प्रतिवादीविरुध्द मिळण्याकरीता दावा दाखल केला आहे. वादींना प्रथमदर्शनी त्यांच्या बाजुने केस आहे, न्यायाचा समतोल वादीच्या बाजुने आहे. वादींना प्रतिवादीविरुध्द तुर्तातूर्त मनाई आदेश न दिल्यास वादींचे कधीही न भरुन येणारे नुकसान होणार आहे. या सर्व कारणास्तव वादींनी प्रतिवादीविरुध्द तहसिलदारा यांच्या आदेशाची अंमलबजावणी करण्यास प्रतिवादी आणि वादींच्या ताबेवहिवाटीस हरकत अडथळा प्रतिवादीने दाव्याचा अंतिम निकालापावेतो करु नये अशी तुर्तातूर्त मनाईची मागणी केली आहे. या सर्व कारणास्तव वादींनी अर्ज मंजुर करण्याची विनंती केली आहे.

७. याउलट प्रतिवादी यांनी दाव्यात हजर होऊन नि. १४ अन्वये त्यांची कैफियत व जबाब दाखल केला आहे. त्यांनी वादींची कथने नाकारली आहेत. त्यांचे असे कथन आहे की, दावा/अर्जातील मागणी व मजकुर खोटा व लबाडीचा आहे. दावा

दाखल करण्यास कोणतेही कायदेशीर हक्क व अधिकार नाही. वादीने महत्वाची व खरी वस्तुस्थिती व माहिती सदर दाव्यात व अर्जात नमुद न करता मे. कोर्टापासुन लपवुन ठेवलेली आहे. वादी हे स्वच्छ हाताने न्याय मागत नाही. दाव्यात आवश्यक लोकांना पक्षकार केले नसुन सदर दाव्यास नॉन जॉईंन्डर ऑफ नेसेसरी पार्टीज या तत्वाची बाधा येत असुन या मुद्यावर वादीचा दावा फेटाळण्यास पात्र आहे. दावा दाखल करण्यास कोणतेही संयुक्तीक व कायदेशीर कारण घडलेले नाही.

८. त्यांचे पुढे असे कथन आहे की, मौजे देवकरवाडी येथील गट क्र. २२ मध्ये ०२ हे. ०४ आर. एवढे क्षेत्र प्रतिवादीची आई शालन शिवाजी देवकर यांनी गजराबाई सुभान देवकर यांच्याकडुन सन १९९३ साली खरेदीखताने विकत घेतलेली आहे. सदर मिळकत फेरफार क्र. ६१८ अन्वये प्रतिवादीच्या आईच्या नावे ७/१२ सदरी नोंद झालेली होती व तेव्हापासुन ती मिळकत प्रतिवादीच्या ताबेवहिवाटीस होती व आहे. सन २०११ मध्ये प्रतिवादीने सदर मिळकत खरेदीखत दस्त क्र. ३३२७/२०११ अन्वये दि. २१.०७.२०११ रोजी खरेदीखताने विकत घेतलेली आहे. तेव्हापासुन प्रतिवादी सदर मिळकतीमध्ये वहिवाट करीत आहे व जमीनीमध्ये बागायती पिके घेत आहे. प्रतिवादी हे गट क्र. २२ चे मालक झाल्यामुळे वादींनी मुद्दाम प्रतिवादींना सदर क्षेत्रात होणारा पुर्वीपासुन वहिवाटीत असणारा कच्चा रस्ता अडविला व सदर रस्ता अडविल्यामुळे प्रतिवादी यांनी मामलतदार एक्ट ५ नुसार मा. तहसिलदार, दौंड यांच्यासमोर रस्ता खुला करुन मिळणेसंदर्भात अर्ज दाखल केला असता स्वतः मे. तहसिलदार प्रत्यक्ष पाहणीस आले असता सदरचा रस्ता अडवुन वादीने पिके घेतली असल्यामुळे सदरचा रस्ता दिसुन आला नाही व प्रतिवादी हे मामलतदार एक्ट ५ अन्वये रस्ता मिळविण्यास अपात्र ठरले.

९. प्रतिवादींना दुस–या कोणत्याही रस्त्याची सोय नसल्यामुळे व सदर क्षेत्रात ऊसाची नगदी पिके असल्यामुळे नाईलाजास्तव सदर क्षेत्राचे पिकाचे नुकसान होऊ नये म्हणुन महाराष्ट्र जमीन महसुल अधिनियम, १९६६ चे कलम १४३ अन्वये सर्वे क्र. ९३ वरुन जाणारा व गट क्र. १९, २१, २२ व २४ च्या लगत असणा–या व सर्वांना गरजेचा असलेला नवीन रस्ता मिळणेसंदर्भात तहसिलदार, दौंड यांच्यासमोर अर्ज दाखल केला होता. त्या अर्जात मा. तहसिलदार सो., दौंड हे प्रत्यक्ष पाहणीला आले असता सदरचा रस्ता प्रतिवादीस अतिशय गरजेचा असल्याने व सदर रस्ता उपलब्ध करुन न दिल्यास प्रतिवादीचे कधीही न भरुन येणारे नुकसान होणार आहे. रस्ता न दिल्यास प्रतिवादींवर अन्याय होणार असल्याने रस्ता कायदेशीर बाबी तपासुन मंजुर केलेला आहे. प्रत्यक्ष पाहणीवेळी प्रतिष्ठीत व्यक्तींनी मा. तहसिलदार, दौंड यांच्या पंचनाम्यावर सह्या केलेल्या असुन वादी व्यतिरिक्त इतर कोणत्याही ७/१२ सहभाग धारकांची रस्त्याबद्दल नाराजी नसुन त्या रस्त्याबाबत त्यांची मागणीच आहे म्हणुन वादी यांनी ७/१२ वरील सहधारकांना सदर दाव्यात पार्टी केलेले नाही. वादींनी मुद्दाम वेळोवेळी रस्ता अडविण्याचे कारण म्हणजे नाहक त्रास दिल्यास प्रतिवादी हे त्रासाला कंटाळुन सदर मिळकत वादींनाच कमी किमतीत विकतील या वृत्तीमुळे वादी हे प्रतिवादींना नाहक रस्ता अडवुन त्रास देत आहेत. वादी हे प्रतिवादीस मानसिक, शारिरीक व आर्थिक त्रास देण्याचे प्रयत्न करीत होते व आहे. त्याचाच एक भाग म्हणजे सदर खोटा व बनावट मजकुराचा दावा, नि. ५ चा अर्ज दाखल केला असल्याने दावा खर्चासह फेटाळणे आवश्यक व गरजेचे आहे. वादीस प्रथमदर्शनी केस नाही. न्यायाचा समतोलसुध्दा प्रतिवादीच्या बाजुने आहे. वादीचा अर्ज मंजुर केल्यास प्रतिवादींचे कधीही न भरुन येणारे नुकसान होणार आहे. या सर्व

कारणास्तव प्रतिवादीने वादीचा अर्ज खर्चासह रद्द करण्याची विनंती केली आहे.

१०. वादीतर्फे विद्वान वकील श्री. जी. एस. भापकर व प्रतिवादीतर्फे विद्वान वकील श्री. एन. एम. साखरे यांचा सविस्तर युक्तीवाद ऐकला. वादीतर्फे लेखी युक्तीवाद नि. २६ चे अवलोकन केले. वादींनी त्यांच्या युक्तीवादात खालील न्यायनिवाड्यांचा आधार घेतलेला आहे.

01. **Krishna Dhamaji Choudhary & Anr. Vs. Addl. Commissioner Nagpur Division & Ors. 2012(1) (Mh.L.J. 795 to 799)**

02. **Baburao Maruti Sawant Vs. Hanumant Yeda Naik & Ors. (W.P.No. 2086/2013 in the Court of Hon'ble Bombay High Court, Bench at Aurangabad)**

उपरोक्त न्यायनिवाड्यातील न्यायतत्वे मी विचारात घेतलेली आहेत.

११. वादी व प्रतिवादींचे परस्परविरोधी कथन विचारात घेता खालील प्रश्न निर्माण होतात. त्यावरील निष्कर्ष व कारणमिमांसा येणेप्रमाणेः–

| अ.क्र. | प्रश्न | | निष्कर्ष |
|---|---|---|---|
| १. | प्रथमदर्शनी प्रकरण वादींच्या बाजुने आहे काय? | – | **नाही** |
| २. | न्यायाचा समतोल वादींच्या बाजुने आहे काय? | – | **नाही** |
| ३. | अर्ज नामंजुर झाल्यास वादींचे भविष्यात न भरुन निघणारे नुकसान होईल असे वादी सिद्ध करतात काय? | – | **नाही** |
| ४. | आदेश काय? | – | **अंतिम आदेशाप्रमाणे** |

## का र ण मि मां सा

१२. वादींनी त्यांच्या कथनाप्रित्यर्थ नि. ३ यादीलगत मौजे देवकरवाडी येथील गट क्र. १९/१ चा ७/१२ उतारा, मौजे देवकरवाडी येथील गट क्र. २४ चा ७/१२ उतारा, मौजे देवकरवाडी येथील गट क्र. २२ चा ७/१२ उतारा, दि. ३१.०५.२०२२ रोजी तहसिलदार, दौंड यांनी कलम ५/एसआर/४९/२०२१ मध्ये केलेला आदेश, पंचनामा दि. १८.०२.२०२२, दि. ३१.०५.२०२२ रोजीचा आदेश, दि. १२.११.२०२२ रोजी कलम १४३/एसआर/१४/२२ मध्ये तहसिलदार, दौंड यांनी केलेला आदेश, दि. १२.१२.२०२२ रोजी कलम १४३/एसआर/१४/२२ मध्ये तहसिलदार, दौंड यांनी केलेला आदेश, कलम १४३/एसआर/१४/२२ मध्ये तहसिलदार, दौंड यामधील रोजनामा, कलम १४३/एसआर/१४/२२ मध्ये तहसिलदार, दौंड यांनी पाठविलेली नोटीस, कलम १४३/एसआर/१४/२२ मध्ये तहसिलदार, दौंड यांचे समोर प्रतिवादीने केलेल्या अर्जातील प्रत व कागदपत्रे, पंचनामा दि. १९.१०.२०२२ गांव नकाशा, वादीतर्फे त्या अर्जातील लेखी युक्तीवाद, प्रतिवादीतर्फे त्या अर्जातील लेखी युक्तीवाद या कागदपत्रांच्या छायांकित प्रती व चार छायाचित्रे, तसेच यादी नि. २२ लगत वादी यांनी

पोलीस निरीक्षक, यवत पोलीस स्टेशन यांना पोलीस बंदोबस्त नामंजुर करण्याबाबत दिलेला विनंती अर्ज छायांकित प्रत इत्यादी कागदपत्रे दाखल केलेली आहेत.

**१३.** याउलट प्रतिवादीने नि. १९ यादीलगत खरेदीखत दि. २१.०७.२०११ ची छायांकित प्रत, फेरफार क्र. ६१८ ची प्रमाणित प्रत, एक छायाचित्र इत्यादी कागदपत्रे दाखल केलेली आहेत.

**<u>दोन्ही पक्षांना मान्य असलेली परिस्थिती :-</u>**

**१४.** वादी क्र. १ व २ गट क्र. १९/१ चे मालक व ताबेदार आहेत (नि. ३/१). वादी क्र. ३ व त्यांचे कुटूंबिय हे गट क्र. २४ चे मालक व ताबेदार आहेत (नि. ३/२). शालन शिवाजी देवकर म्हणजे प्रतिवादीच्या आई यांनी गट क्र. ३६१ हे गजराबाई सुभान देवकर यांच्याकडुन खरेदी घेतले फेरफार क्र. ६१८(नि. १९/२). प्रतिवादी यांनी दि. २१.०७.२०११ खरेदीदस्त कडग ३३२७/२०११ नुसार त्यांची आई शालन देवकर यांच्याकडुन गट क्र. २२ क्षेत्र २ हे. २ आर. अधिक पोटखराबा ०० हे. ५ आर. एकुण २ हे. ७ आर. क्षेत्र नोंदणीकृत खरेदीदस्ताने विकत घेतलेले आहे (नि. १९/१). प्रतिवादीने कलम ५/एसआर/४९/२०२१ अन्वये वादी क्र. १ ते ३ व इतर विरुध्द गट क्र. १९/१ व गट क्र. २४ च्या बांधावरुन वादी व इतर यांनी रस्ता अडविला म्हणुन तहसिलदार, दौंड यांच्याकडे रस्ता खुला करुन मिळावा याकरीता दाखल केला. त्यामध्ये तलाठी, देवकरवाडी यांनी वादी क्र. १ व ३ व प्रतिवादी यांच्या समक्ष दि. १८.०२.२०२२ रोजी पंचनामा (नि. ३/५) केला. त्या पंचनाम्यात त्यादिवशी गट क्र. १९ मध्ये रस्ता दिसुन आला नाही व गट क्र. २४ चे लगत पालक पेरलेले दिसुन येते. प्रतिवादीचे क्षेत्र पाटेठाण-दहिटणे रस्त्यापासुन पश्चिमेस ५०० फुटावर आहे व त्याच्या गटाच्या पश्चिमेस ओढा आहे असे नमुद आहे. त्या पंचनाम्यावरुन तहसिलदार यांनी प्रतिवादींचा रस्ता खुला करुन मिळण्याचा अर्ज दि. ३१.०५.२०२२ रोजी (नि. ३/४ व ३/६) नामंजुर केला.

**१५.** त्यानंतर प्रतिवादी यांनी कलम १४३/एसआर/१४/२२ वादी क्र. १ व ३ विरुध्द तहसिलदार, दौंड यांचे न्यायालयात गट क्र. २२ मध्ये जाणे-येण्यासाठी शेतीची अवजाने नेणे, मालाची वाहतुक करण्यासाठी रस्ता नसल्याने गट क्र. १९ व २४ चे बांधावरुन ५०० फुट लांबीचा व १० फुट रुंदीचा रस्ता मिळण्याबाबत अर्ज दाखल केला (नि. ३/१०). त्या अर्जाची नोटीस वादी क्र. १ व ३ यांना नि. ३/९ नुसार मिळाली व ते त्या अर्जात हजर झाले. त्यामध्ये तहसिलदार यांनी दि. १९.१०.२०२२ रोजी पंचनामा (नि. ३/११) केला. त्या पंचनाम्याचे अवलोकन केले असता त्यामध्ये गट क्र. २४ च्या उत्तरेस गट क्र. १९ ला लागुन तारेचे कुंपन केले आहे, तसेच गट क्र. २४ व १९ सरबांधावर महावितरणाचे चार पोल आहे, तसेच गट क्र. १९ मध्ये चार ते पाच महिन्याचे ऊसाचे पिक आहे. प्रतिवादीच्या पश्चिमेकडील बाजुस गट क्र. २, ३, ४ हे गट असुन त्या गटाच्या पश्चिमेकडील बाजुला राहु रोड-दहिटणे रस्ता असुन त्याचे गट क्र. २२ पासुनचे अंतर १३४४ फुट आहे. गट क्र. ३, ४, ५ मध्ये ऊस हे पिक आहे. हे सोडुन प्रतिवादींना जाणे-येणेकरीता अन्य कोणताही रस्ता नाही. सदरच्या स्थळपाहणीच्या वस्तुस्थितीदर्शक नकाशा करण्यात आला आहे असे नमुद आहे. त्या अर्जामध्ये वादी क्र. १ व ३ यांनी लेखी युक्तीवाद (नि. ३/१३) दाखल केला होता. तसेच प्रतिवादी यांनी नि. ३/१४ नुसार लेखी युक्तीवाद दिला होता. त्याची चौकशी होऊन नि. ३/७ नुसार तहसिलदार,

दौंड यांनी गुणदोषावर प्रतिवादीचा अर्ज दि. १२.११.२०२२ रोजी मंजुर करण्याचा आदेश केला. तसेच प्रतिवादीस जमीन गट क्र. २२ मध्ये जाणेयेण्यासाठी पाटेठाण–दहिटणे उत्तर–दक्षिण रस्त्याला लागुन पश्चिमेकडे गट क्र. २४ व १९ च्या बांधावरुन पुर्वेकडुन पश्चिमेकडे दहा फुट रुंदीचा रस्ता मंजुर केला. तसेच रस्ता तयार करीत असतांना जमीन गट क्र. १९ व २४ च्या सरबांधावर असलेले महावितरणाचे पोल महावितरण विभागाचे कर्मचारी यांच्या मदतीने व खर्चाने स्थलांतरीत करुन घ्यावे तसेच लगतच्या शेतक–याच्या पिकाचे नुकसान होणार नाही याची अर्जदाराने जबाबदारी घ्यावी, आदेशाची अंमलबजावणी अपिल कालावधीनंतर करण्यात यावी असा आदेश केलेला आहे. तसेच नि. ३/८ नुसार सदर आदेशाची संबंधीतांना समज देण्यात यावी असे तहसिलदार, दौंड यांनी आदेश दिले होते. प्रतिवादी यांनी तहसिलदार यांनी दिलेल्या आदेशाची अंमलबजावणीसाठी पोलीस बंदोबस्त नामंजुर करण्यासाठी वादीने दि. २०.०४.२०२३ रोजी नि. २२/१ नुसार विनंती अर्ज यवत पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक यांना दिले होते, या बाबी वादातीत नाहीत.

**<u>प्रश्न क्र. १ ते ३ करीताः–</u>**

**१६.** सर्व प्रश्न एकमेकांशी निगडीत असल्यामुळे त्यांची पुनरावृत्ती टाळण्याकरीता सर्व प्रश्न एकत्रीत विवेचनाकरीता घेत आहे. वादीने दावा तहसिलदार, दौंड यांनी कलम १४३/एसआर/१४/२०२२ मध्ये दि. १२.११.२०२२ रोजी प्रतिवादीस गट क्र. २४ व १९ च्या बांधावरुन पुर्वेकडुन पश्चिमेकडे १० फुट रुंदीचा रस्ता मंजुर केला, तो आदेश बेकायदेशीररित्या केलेला आहे. तो आदेश रद्द करुन मिळण्यासाठी तसेच प्रतिवादीविरुध्द मनाईसाठी दाखल केलेला आहे. वादी व प्रतिवादी यांनी दाखल केलेली कागदपत्रे व वर नमुद मान्य परिस्थिती पाहता प्रतिवादीने कलम ५ अन्वये दाखल केलेल्या अर्जाच्या चौकशीच्या वेळेस पंचनामा हा तलाठी, देवकरवाडी यांनी केला होता. तसेच कलम १४३ अन्वये दाखल केलेल्या अर्जाच्या चौकशीकामी तहसिलदार, दौंड यांनी दि. १९.१०.२०२२ रोजी स्थळपाहणी पंचनामा केला होता. दोन्ही पंचनाम्यात नमुद वस्तुस्थिती या थोड्याफार प्रमाणात सारख्या असल्यातरी प्रतिवादी म्हणजे त्या अर्जातील अर्जदार यांना गट क्र. २२ मध्ये जाणे–येणेकरीता गट क्र. २, ३, ४ व ५ मधुन अन्य कोणताही रस्ता नाही तसेच गट क्र. २४ व १९ चे सरबांधावर महावितरणाचे चार पोल आहेत असे त्यामध्ये नमुद आहे. परंतु वादी हे गट क्र. २४ व १९ वर कोणताही बांध अगर सरबांध नाही असे दाव्यात नमुद करतात. प्रतिवादीस अन्य कोणताही रस्ता नसल्यामुळे वस्तुस्थिती पाहुन तहसिलदार यांनी गुणदोषावर चौकशी करुन प्रतिवादींचा अर्ज मंजुर केलेला आहे. सद्यस्थितीत तहसिलदार यांनी स्वतःचे अधिकार क्षेत्राच्या बाहेर जाऊन प्रतिवादीच्या बाजुने बेकायदेशीररित्या आदेश पारीत केल्याचे मला प्रथमदर्शनी दिसुन येत नाही. तसेच वादींनी दाखल केलेली कागदपत्रे तसेच छयाचित्र पाहता गट क्र. १९ व २४ मध्ये तारेचे कुंपन केले ही बाब पंचनाम्यात स्पष्ट होते. परंतु गट क्र. २४ व १९ वर कोणताही बांध अगर सरबांध नाही या वादींच्या कथनात मला तथ्य दिसुन येत नाही.

**१७.** तसेच तहसीलदार यांनी केलेला आदेश कायदेशीर आहे किंवा बेकायदेशीर आहे या बाबी दोन्ही पक्षाचा पुराव्या अंती न्यायनिर्णयाच्या वेळेस ठरणार आहे. तसेच प्रतिवादी हे २०११ पासुन खरेदी घेतलेल्या क्षेत्रात पिके घेत आहेत व त्यांना जाणे–येण्याकरीता, माल वाहतुक करण्याकरीता रस्ता नसल्यामुळे त्यांनी तहसिलदार

यांच्याकडे अर्ज केला होता. त्याची चौकशी होऊन तसेच वादी क्र. १ व ३ यांनी चौकशीमध्ये हजर होऊन त्यांचे जबाब व लेखी युक्तीवाद दाखल केले होते व त्यानंतरच तहसिलदार यांनी आदेश केलेले दिसुन येते.

**१८.** त्यामुळे वादी व प्रतिवादीचे कथन, दोन्ही बाजुस मान्य असलेली परिस्थिती तसेच वर नमुद विवेचन विचारात घेता प्रथमदर्शनी केस वादींच्या बाजुने असल्याचे सिध्द होत नाही. त्यामुळे न्यायाचा तराजु देखील वादींच्या बाजुने दिसुन येत नाही. याउलट वादींचा अर्ज मंजुर केल्यास प्रतिवादी यांना दावा मिळकत क्र. १क मध्ये असलेले मालकी हक्क व त्याची वहिवाट करणेकामी आवश्यक रस्ता न मिळाल्यास त्यांना येणे–जाणे करता येणार नाही, त्यांना रस्ता मिळाला नाही तर त्यांचे कधीही भरुन न येणारे नुकसान होणार आहे. वर नमुद वस्तुस्थिती व परिस्थिती दोन्ही पक्षांचा युक्तीवाद, अभिलेखावरील कागदपत्रे याचा सर्वकष विचार करता मी प्रश्न क्र.१ ते ३ चे निष्कर्ष 'नाही' नोंदवित आहे.

**प्रश्न क्र. ४ करिताः–**

**१९.** प्रश्न क्र.१ ते ३ वर नोंदविलेल्या निष्कर्षाच्या अनुषंगाने वादीने प्रथमदर्शनी केस असल्याचे, सोयीचा कल वादीच्या बाजुने असल्याचे सिध्द केलेले नाही व प्रस्तुत अर्ज नामंजुर केल्यास वादीचे कोणतेही नुकसान होणार नाही याउलट अर्ज मंजुर केल्यास प्रतिवादीचे कधीही न भरुन येणारे नुकसान होईल. वादी व प्रतिवादींनी नमुद केलेले प्रश्न हे दोन्ही पक्षांनी आपापला पुरावा दिल्यानंतर अंतिम निकालाच्या वेळी सिध्द होईल. त्यामुळे प्रश्न क्र.४ च्या निष्कषार्थ मी खालील आदेश करीत आहे.

**आदेश**

१. वादींचा नि.क्र.५ चा अर्ज नामंजुर करण्यात येत आहे.

२. खर्चाचे आदेश निकालाधीन.

JYOTI BHARAT GOYAL
Digitally signed by JYOTI BHARAT GOYAL
Date: 2023.10.25 18:13:35 +0530

दौंड
दि. २५.१०.२०२३

[ **श्रीमती. जे.एस.खेडकर–गोयल** ]
दिवाणी न्यायाधीश क.स्तर, दौंड
ता.दौंड, जि. पुणे

## CERTIFICATE

I affirm that the contents of this P.D.F file of Order are same, word to word, as per the original Order.

| | | |
|---|---|---|
| Name of Steno | :- | P. D. Jagatap. |
| Name of the Court | :- | Smt. J. S. Khedkar-Goyal,<br>C.J.J.D. & J.M.F.C. (Court No. 01),<br>Tal. Daund, Dist. Pune. |
| Order date | :- | 25.10.2023. |
| Order singed by the Presiding Officer on | :- | 25.10.2023. |
| Order uploaded on | :- | 25.10.2023. |